# बी. एस. एन. एल. ने ग्राहकांभिमुख योजना राबवावी : खासदार चंद्रकांत खैरे

## दुरध्वनी, भम्रणध्वनीसह माहिती तंत्रज्ञानाच्या स्पर्धेत ग्राहकहित जपवण्याची सुचना

**संभाजीनगर ( ता.१० ) :** खाजगी दुरसंचार कंपन्यांच्या तुलनेत बी. एस. एन. एल. सी सेवा विस्कळीत असल्याने मोठ्या प्रमाणात पोर्टीबिलीटी वाढत आहे. सध्याच्या ग्राहकांना व्यवस्थित सेवा देत बी. एस. एन. एल. कडे ग्राहक वळतील यापध्दतीने जिल्ह्यात ग्राहकाभिमुख योजना राबविण्याच्या सुचना शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी बैठकित दिल्या. सिडको येथील संचार सदन सभागृहात आज शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय दुरसंचार सल्लागार समितीची बैठक पार पडली.

केंद्र शासनाच्या अधिपत्याखाली प्रत्येक जिल्ह्यात दुरसंचार सल्लागार समितीची नेमणुक करण्यात येते. या समितीच्या अध्यक्षपदी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांची निवड करण्यात आली. अध्यक्षांसह ८ सल्लागार समिती सदस्यांची नियुक्ती यावेळी करण्यात आली.

शहरातील विविध ग्राहकांनी बैठकित वाढीव फोन बील, नेटवर्क समस्या, दुरुस्तीच्या तक्रारी यासारख्या समस्या मांडला, निपट निरंजन नगर भागातील नागरिकांनी सांगितले की जवळपास २५ दुरध्वनी जुन महिण्यापासुन बंद आहे. १० ते १५ ग्राहकांनी सेवेला कंटाळून जोडणी बंद केली आहे.

अधिकाऱ्यांनी उवाडउडवीचे उत्तर देत प्रकरण टाळल्याचे सांगितले, बऱ्याच ठिकाणी घरातसुध्दा मोबाईल नेटवर्क पकडत नाही, ग्रामीण भागातील सोयगाव, सिल्लोड, कन्नड भागातील डोंगराळ भागात टावर्सची संख्या वाढवुन कृषी प्लॅन सारख्या योजना पुरव्यावात थ्री जी व फोर जी सारख्या सेवांची सुविधा गतीशिल करुन व्यवसाय वाढवावा.

बी. एस. एन. एल.चे खाजगीकरण थांबविण्यासाठी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी स्वत:हा हस्तक्षेप करुन प्रकरण थांबविले, अन्यथा केव्हाच खाजगीकरण होऊन कर्मचाऱ्यांना शासकिय सेवांचा फायदा झाला नसता ही आठवण सांगितली.

या बैठकिस मुख्य महाप्रबंधक नितीन महाजन, उपमहाप्रबंधक एच. बी. शेवगांवकर, आय. झेड. गायकवाड, मुख्यालेखाधिकारी एस. बी. दळे, डि.के. शेंडे, पी. ए. सोनवणे, पी. बी. डोंगरे, आय. वाघमारे,बी. म. डोंगरे, बी. आय. वाघमारे, बी. एम. चिटणीस, दुरसंचार सल्लागार समिती सदस्य राधाकृष्ण गायकवाड, बंडू ओक, शिवाजी बनकर पाटील, निलेश भाटीया, माजी महापौर कला ओझा, रंजना कुलकर्णी, सुनिता देव, अनिता शिंदे, पुष्पा गव्हाणे, किरण शर्मा या सदस्यांची निवड करण्यात आली.

या बैठकिस नगरसेवक मकरंद कुलकर्णी, पंढरीनाथ गोंडे पाटील, सचिन गोखले आदिंसह बी. एस. एन. एल. ग्राहकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**प्रसिध्दी प्रमुख**

**गणेश वाघ**

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , ganeshwagh4400@gmail.com manojwadgaonakar@gmail.com

8484066606/9604384400/8983560831